# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद
## यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल, तळमजला,
## मनमाला टँक रोड, माटुंगा - माहिम, मुंबई ४०० ०१६.

**दिनांक : १२ मार्च २००७**

## (फक्त सभासदांसाठी)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची इ. सन २००५-२००६ (१ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६) वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक ३१ मार्च २००७ रोजी सकाळी १०.३० वा. परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांचे अध्यक्षतेखाली यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल, तळमजला, मनमाला टँक रोड, माटुंगा-माहिम, मुंबई ४०० ०१६ येथे होणार आहे. या सभेस उपस्थित राहून सहकार्य द्यावे, ही विनंती.

## * सभेचे कामकाज *

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून संमत करणे.
२. परिषदेच्या १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६ या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करणे व संमत करणे.
३. परिषदेच्या १ एप्रिल २००५ ते ३१ मार्च २००६ या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व संमत करणे.
४. इ. सन २००७-०८ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संमत करणे.
५. इ. सन २००६-०७ या वर्षाकरिता हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
६. नाट्यसंकुल सर्वकष विचार करणे.
७. परिषदेच्या भावी कार्यासंबंधी विचार करणे.
८. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांचा विचार करणे.

आपला,

**प्रदीप कबरे**
**प्रमुख कार्यवाह.**

### विशेष सूचना :

१. गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास पुन्हा ती सभा त्याच जागी अर्ध्या तासानंतर वरील कामकाजासाठी भरेल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहाणार नाही.
२. सभासदांना अहवाल अगर जमाखर्चासंबंधी अधिक माहिती विचारावयाची असेल त्यांना ती माहिती दि. २६ मार्च २००७ ते दिनांक २९ मार्च २००७ पर्यंत प्रतिदिनी सांय. ६ ते ८ या वेळेत परिषद कार्यालय, माटुंगा-माहिम, मुंबई ४०००१६ येथे पुरविण्यात येईल.
३. वार्षिक सभेत ठराव/सूचना करावयाच्या असल्यास सूचक व अनुमोदक यांच्या सहीने ठरावासह त्या अर्थाची लेखी सूचना दि. २७ मार्च २००७ पर्यंत परिषदेच्या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.
४. वार्षिक अहवाल शाखेच्या सभासदांसाठी शाखेच्या कार्यालयात, तसेच मुंबईतील सभासदांसाठी मध्यवर्ती कार्यालयात अवलोकनार्थ उपलब्ध होईल.
५. ज्या सभासदांचे पत्ते बदलले आहेत त्यांनी कृपया आपला नवीन पत्ता कळवावा. त्याचप्रमाणे आपले दूरध्वनी क्रमांक (घर, कार्यालय व मोबाईल) कळवावेत.

## महत्वाचे निवेदन

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची सभासद संख्या (शाखा सभासदांसहित) अकरा हजाराहून अधिक आहे. या सर्वांना अहवाल पाठविण्यास भरमसाठ वाढलेला टपाल खर्च करणे आर्थिक तरतुदीच्या अभावी केवळ अशक्य आहे. त्यामुळे प्रतिवर्षी होणारा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा, नाट्य संमेलन, सत्कार आणि अन्य नाट्यविषयक कार्यक्रम आदींचे निमंत्रण वृत्तपत्राद्वारे सभासदांना कळविण्यात येईल. सर्व सभासदांनी परिषदेला याबाबतीत सहकार्य करावे ही विनंती.